Exh. 11

# कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम श्रेणी, कुरखेडा

कौ.हि.म.सं.क्र ०५/२०२४

अर्जदार – १ सौ शारदा महेश कावळे
वय २८ वर्षेधंदा-घरकाम
२. कुमारी. श्री महेश कावळे
वय ०२ वर्षे,अ.पा.क.नामे शारदा कावळे
दोन्ही रा. गांधी वार्ड कुरखेडा ता. कुरखेडा
जि. गडचिरोली श्री. भाष्कर शिवराम देशमुख
यांच्या राहते घरी.

-विरूध्द-

गैरअर्जदार- श्री. महेश प्रकाश कावळे
वय ३४ वर्षे धंदा-प्रापर्टी डिलर/लॅन्ड डेवलपर
रा. सांस्कृतीक लान फोरेस्ट नाका
आरमारी रोड , गडचिरोली.व ईतर ४

CIVIL JUDGE (JR. DN.) AND J.M., F.C. * KURKHEDA *

O.S. to say
Deshpande
21/6/24

अर्जदार यांना गैरअर्जदाराकडुन मामल्याचा निकाल लागे पावेतो. दर महा १५००० पंधरा हजार रूप्ये आर्थीक सहाय मिळणेबाबत.

अंतिरीम आदेशाकरीता कलम २३ रिड विथ कलम २० अंतर्गत अर्ज.

अर्जदाराची नम्र विनंती की,

१ अर्जदार यांनी दि.१२/०४/२०२४ रोजी गैरअर्जदार यांचे विरूध्द कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरक्षन कायदयाचे कलम १२ नुसार विद्यमान न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

२ अर्जदार हिने घरगुती हिंसाचारास प्रतिबंध कायदयाचे कलम १८,१९,२० अंतर्गत गैरअर्जदारांन विरूध्द मागण्या केलेल्या आहेत. अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदारकडुन घरगुती खर्चा करीता दर माह १०००० दहा हजार रूप्ये व अर्जदार क्र.२ हीला प्रतिमहा ५००० पाच हजार रूप्ये एकुण दर माह १५००० पंधरा हजार रूप्ये तात्पुरता आर्थीक सहाय्य मिळणे आवश्यक आहे. अर्जदार हिने मुळ अर्जात हिंसाचाराचे घटनेबाबत विस्तृत वर्णन केलेले आहे.

३ अर्जदार हिने मुळ अर्जामध्ये घटनेचा अहवाल सादर केला असुण तो हया अर्जाचा मुळ भाग समजण्यात यावा. सौ.शारदा महेश कावळे हिचे लग्न गैजअर्जदार क्र. १ सोबत ०५/०४/२०२१ रोजी कुरखेडा येथे जाती रीवाजा प्रमाने झाले. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ सोबत त्याचे राहते घरी मौजा- गडचिरोली येथे नांदवयास गेली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १,त्याचे आई-वडिल , वहिनी नामे-नभा तसेच भाउ नामे भुपन हे सर्व एकत्र कुटूंबात राहत होते. गैरअर्जदार क्र.१ हा प्रापर्टी डिलर तसेच लॅंड डेवलपरचा व्यवसाय करायचा.

४ लग्नंतर अर्जदार हिला काही दिवस सुखा समाधानान गैरअर्जदारांनी नांदविले, परंतु त्यानंतर अल्पवधीमध्येच गैरअर्जदार क्र.१ चे आई वडील व त्याच्या कुटूंबातील लोकांनी अर्जदार हीला शाररीक व मारसीक त्रास देणे सुरू केले. त्यावेळी गैअर्जदार क्र.१ चे वडिल मला शुल्लकशा कारणावरून टोमणे मारायचे फेकल्यांची मुलगी मागीतली त्याच प्रमाने गैअर्जदार क्र. हा मला तुच्छ वागणुक देत होते.

2

~~देवुन~~ "तुझ्या पेक्षा चांगल्या मुली मिळाल्या असत्या, फेकल्या गरीबाची मुलगी मागुन पस्तावल आहो, तु तुझ्या नातेवाईकांशी संबंध ठेवायचे नाही" नातेवाईकांशी तसेच घर शेजाऱ्यांशी बोलायचे नाही. असे म्हणुन मला एकाकी पाडायचे व घरचे सर्व गैरअर्जदार एकत्र संघणमत करून मला "तु आमच्या घरची मोलकरीन आहेस मोलकरीन सारखी रहा" असे म्हणुन मला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरू केले. अर्जदार बाईची आत्या, वहिन व भाऊ मौजा गडचिरोली येथेच राहत असतांना त्यांना सुध्दा भेटण्यास मनाई करायचे. एक दिवस अर्जदार बाईचा भाऊ भेटण्यास आला असता, तिचे सासऱ्यांनी अर्जदारबाईच्या भावाला उद्देशुन "आता लग्न झाले, तिचे आणि तुझे नाते संपले" तसेच अर्जदारबाईला तिचे वहिनीने फोन केला असता गैरअर्जदार क्र. १ ने "तुझी वहिन कशाला फोन करते तिला काही काम धंदे नाहीत का" असे बोलुन अर्जदारबाईशी कारण नसतांना बाईट शिवीगाळ करून तुझ्या घरच्या लोकांना आत्ताच्या आत्ता बोलाव, तेव्हा मी वडिलांना त्याबाबत कळविले तेव्हा माझे वडिल व घरचे लोक मौजा गडचिरोली येथे गैरअर्जदारांच्या घरी आले व गैरअर्जदारांना अर्जदारबाईस सुखासमाधानाने नांदविन्याबाबत समज दिली, तेव्हा त्यांच्या समक्ष गैरअर्जदारांनी अर्जदारबाईस चांगली वागविन्याची हमी दिली.

३. अर्जदार क्र. १ ची मोठी वहिन नामे सरिता भुरे व तिचे पति कामा निमित्य गडचिरोली येथे आले असे मला कळल्यामुळे मी त्यांना फोन करून भेटावयास येण्याचे सांगीतले, तेव्हा ते माझ्या घरा पर्यंत आले असता घराच्या बाहेरच थांबले असतांना गैरअर्जदार क्र. १ ने ते माझ्या घरा समोर कशाला आले त्यांनी माझ्या घरी पाय कशाला ठेवले असे म्हणुन त्यांचा अपमान केला व अर्जदारबाई सोबत कारण नसतांना भांडण करून तिला बाईट शब्दात शिवीगाळ केली, तेव्हा अर्जदार बाईची वहिन व तिचे पति तिथुन निघुन गेले. अर्जदारबाईस गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करावयाचा असल्यामुळे तिने झालेल्या घटणे बाबत वाद विवाद केला नाही. .

४. अर्जदारबाई दिवाळी निमित्याने माहेरी आली होती, त्या दरम्यान तिची प्रकृती चांगली नसल्यामुळे ती डॉक्टरांकडे गेली असता दि.२०/११/२०२१ रोजी अर्जदारबाई गर्भवती असल्याचे कळले. ती गर्भवती असतांना देखील मुद्दाम क्षुल्लकशा कारणावरून अपशब्दात बोलले जात होते. अर्जदारबाई गर्भवती असल्याचे गैरअर्जदारांना माहिती झाल्या नंतर "आम्हाला मुलगाच पाहिजे, मुलगी कोणत्या कामाची नाही, होईल ती हिच्यासारखी भिकारीनच होईल" असे घरातील सर्वच गैरअर्जदार

(४)

निरर्थक बोलायचे. त्यावेळी पहिले बाळंतपण माहेरी करावं लागते म्हणुन मला माझ्या सासऱ्यांनी माहेरी बाळंतपणासाठी मौजा कुरखेडा येथे पाठविले.

५. त्यानंतर दि. ०७/०६/२०२२ ला डॉक्टरकडे तपासणी करीता अर्जदारबाई गेली असता सोनोग्राफी मध्ये कळले की बाळाच्या गळयाभोवती नाळ असल्यामुळे व गर्भात पाण्याची कमतरता आल्याने बाळाने पोटातच संडास केली. त्यामुळे लवकरात लवकर सिझरीन करावी लागेल, तेव्हा डॉक्टरांनी जो सल्ला दिला त्याबद्दल अर्जदारबाईने गैरअर्जदार क्र. १ ला फोनद्वारे कळविले की, ऑप्रेशन करीता तुमची सही लागेल आपण लवकरात लवकर दवाखायात पोहचा, त्यानंतर माझा भाऊ, भाचा, आजी असे मिळुन किरायाची गाडी करून आम्ही ब्रम्हपुरीच्या दवाखान्यात गेलो, तेथे माझी वहिन नामे सरीता भुरे व तिचे पति दवाखान्यात आले. परंतु गैरर्जदार हे कुणीही दवाखान्यात पोहचले नाही व त्यांनी फोन केला नाही, दुपारचे ४ वाजले तरी ते दवाखान्यात पोहचले नाही. अर्जदारबाईचे नातेवाईक हेच डॉक्टरांना भेटले व त्यांच्या संमतीने दवाखान्यात अर्जदारबाईवर सिझरीनची शस्त्रक्रिया झाली व अर्जदार क्र. २ ही मुलगी जन्माला आली. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजताच्या दरम्यान गैरअर्जदार क्र. १ व त्याचे आई-वडिल दवाखान्यात पोहचले, तेव्हा त्यांना कळले की मुलगी झाली, त्यावेळीस ते नाराज झाले म्हणाले की "आम्हाला मुलगा हवा होता" काही वेळ थांबुन कसलिही विचारपुस न करता व औषध उपचाराची काळजी न घेता मुकाट्याने तिथुन निघुन गेले.

६. त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार बाईस तिच्या व तिच्या मुलीच्या प्रकृती बद्दल विचारपुस केली नाही व फोन करून बोलले नाही. मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला १५ दिवसा नंतर घेवुन जाण्यासाठी येतो म्हणुन सांगीतले, परंतु डॉक्टरांनी ऑप्रेशन झाल्यामुळे ३ महिने आराम करण्याचा सल्ला दिला त्यामुळे मी सध्या माहेरी राहाते म्हणुन फोन व्दारे कळविले. माहेरी माझ्या मुलीचे नाम करण करून "श्री" असे नाव ठेवले. त्यानंतर गैरअर्जदार हे मला सासरी येण्यास जबरदस्ती करीत होते, त्यामुळे अर्जदारबाईस नांदायचे असल्यामुळे ३ महिन्याच्या आधीच म्हणजे दि.२३/०९/२०२२ रोजी मुलीला घेवुन सासरी गेली. मी ओली बाळंतीन असतांना सुध्दा मला सासरचे लोक अवजड काम करवुन घेत होते, त्यामुळे मला शारिरीक त्रास सहन करावे लागले.

(5)

७. त्यानंतर माझी मुलगी "श्री" ही ७ महिन्याची असतांना अर्जदारबाई दुसऱ्यांदा गर्भवती राहिली ही बाब गैरअर्जदार क्र. १ ला सांगीतली. अर्जदारबाई दुसऱ्यांदा अल्पावधीत गर्भवती राहिल्यामुळे तिला शारिरीक व मानसिक त्रास सुरू झाला, पोटात दुखने सुरू होवुन रक्तस्राव सुध्दा सुरू झाला पोटात, पाठित व कमरेत दुखने सुरू झाले व प्रकृती बिघडली त्यामुळे दि. २९/०३/२०२३ रोजी जिल्हा रूग्नालय गडचिरोली येथे औषध उपचार करीता नेले असता त्या ठिकाणी तिची सोनोग्राफी काढण्यात आली, रिपोर्ट प्राप्त झाल्या नंतर २. महिन्याचे गर्भ असुन परिस्थीती पाहता डॉक्टरांनी गर्भपात करण्याचा सल्ला गैरअर्जदार क्र. १ ला डॉक्टरांनी दिला. व दवाखान्यात भर्ती करण्याचा सल्ला दिला तेव्हा मला भर्ती न करता घरच्या लोकांचा सल्ला घेवु म्हणुन गैरअर्जदार क्र. १ नी मला दवाखान्यातुन घरी नेले, तेव्हा घरचे सासु सासरे यांनी माझ्या प्रकृतीची चौकशी न करता "आम्हाला मुलगा पाहिजे म्हणुन हे बाळ ठेवायचे आहे, तु मेलीस तरी चालेल पन गर्भपात करू देणार नाही" असे म्हणुन "मोठ्या रईस बापाची पोरगी आहेस म्हणुन दुसरे पोर सांभाळु शकत नाही, रईसाच्या घरी पैदा व्हायला पाहिजे होती" असे म्हणुन गर्भपात करण्यास मनाई केली, त्यावेळी माझी प्रकृती दिवसेन दिवस बिघळत चालली असतांना मला बसने-उठणे, चढणे कठीण झाले व वारंवार रक्तस्त्रावाचा त्रास वाढत गेला परंतु मला गैरअर्जदार हे दवाखान्यात घेवुन जात नव्हते व औषध उपचार करीत नव्हते त्यांनी माझ्या प्रकृतीकडे कायमचे दुर्लक्ष करीत होते.

८. मला होणारा त्रास असहय झाल्यामुळे मी दि.१५/०४/२०२३ रोजी नाईलाजाने मी माझ्या वडिलांना फोन करून मला होणाऱ्या त्रासा बद्दल सांगीतले व मला डॉक्टरांकडे घेवुन जान्या करीता विनंती केली, तेव्हा माझे वडिल व काही प्रतिष्ठीत ३-४ लोकांना घेवुन दि.१७/०४/२०२३ रोजी माझ्या सासरी मौजा गडचिरोली येथे आले व माझ्या प्रकृती बद्दल विचारपुस केली असता गैरअर्जदार क्र. १ व त्याचे कुटूंबातील आई-वडिल, वहिन- भाऊ यांनी वाद उपस्थित करून भांडण केले आम्हाला मुलगाच पाहिजे असा आग्रह करून आम्हाला गर्भपात करू दयायचा नाही व दवाखान्यालही न्यायचा नाही असे बोलले, तेव्हा माझ्या वडिलांनी माझ्या प्रकृतीचा विचार करून निर्णय घ्यावा असे सुचविले परंतु गैरअर्जदार हे मानन्यास तयार नव्हते. म्हणुन झालेल्या घटणे बाबत मी नाईलाजाने दि. १७/०४/२०२३ रोजी माहेरी जान्या पुर्वी पोलिस स्टेशन गडचिरोली येथे गैरअर्जदारा विरूध्द लेखी तक्रार दाखल केली त्या अनुषंगाणे मामला महिला समुपदेशन केंद्रात पाठविण्यात आले व दि. १७/०४/२०२३ रोजी महिला समुपदेश केंद्रात गैरअर्जदारांना बोलाविन्यात

आले. त्यांना समज देण्यात आली परंतु ते ऐकायला तयार नसल्यामुळे व माझी प्रकृती बरी नसल्यामुळे नाईलाजाने मी माझ्या मुलीला घेवुन वडिलांसोबत माझे माहेरी आली.

९. मी माहेरी आल्या नंतर माझी प्रकृती अधिकच बिघडली मला अधिकच रक्तस्त्राव सुरू झाले व पोटात सतत दुखल्यामुळे मी वडिलांसोबत दि. २२/०४/२०२३ रोजी डॉ. खोब्रागडे मॅडम ब्रम्हपुरी यांच्या दवाखान्यात औषध उपचारासाठी गेली. त्यावेळी त्यांनी माझी तपासणी करून दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.२३/०४/२०२३ रोजी बोलविले व तपासणी अंती त्या दिवशी मला सांगण्यात आले की, गर्भपात केल्या शिवाय पर्याय नाही न केल्यास आईच्या जिवीतास धोका असल्याचे सांगीतले. हि बाब माझ्या पतिस फोन करून सांगीतली व तावडतोब दवाखान्यात येण्यास विनंती केली, परंतु माझे पति दवाखान्यात आले नाही व मला फोन सुध्दा केला नाही त्यामुळे नाईलाजाने मी डॉक्टरांच्या सल्ल्या नुसार दि.२३/०४/२०२३ रोजी गर्भपात केला. तेव्हा पासुन मी माझ्या माहेरी वडिलांच्या घरी राहत असुन माझ्या पतिने माझ्या प्रकृतीची तसेच मुलीच्या संबंधाने कधिही विचारपुस केली नाही आम्हास भेटण्यास आला नाही व आमच्या पालण पोषणाकडे कायमचे दर्लक्ष केले. त्यामुळे अर्जदार बाईस नाईलाजाने प्रस्तुत मामला गैरअर्जदारांन विरूध्द विद्यमान न्यायालयात दाखल करणे भाग पडले आहे.

१०. अर्जदारबाई सध्या वडिलांच्या आश्रयाने मुलीला घेवुन जिवन जगत असुन तिला उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ ला उत्पन्नाचे भरपुर साधन असुन तो गर्भश्रीमंत आहे, त्याचा स्वतंत्र प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय असुन तो प्रॉपर्टी डिलर व लॅन्ड डेव्हलपर चा व्यवसय करतो, तसेच त्याला स्वसंपादीत शेतजमिनी आहेत त्या व्यवसायातुन तो वर्षा काठी १० ते २० लाख रूपये कमावतो त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ चे पालण पोषनाची व्यवस्था करण्यास सक्षम आहे. तसेच अर्जदारांच्या पालणपोषणाची कायदेशिर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ ची आहे, त्या करीता अर्जदार ही खालील प्रमाणे मागणी करीत आहे.

प्रार्थना,

अर्जदाराची मागनीची नम्र विनंती की,

१ गैरअजदाराने अन्न वस्त्र निवारा , व ईतर आवश्यक पुर्तते करीता प्रती माह १५००० पंधरा हजार रूप्ये तसेच अर्जदार क्र.२ हिला ५००० पाच हजार रूप्ये देण्याचा आदेश पारीत करावा.

२ या अर्जाचा संपुर्ण खर्च गैरअर्जदार क्र.१ विरूध्द लादण्यात यावा.

३ विद्यमान न्यायालयास याग्य वाटेल ती आदेश अर्जदार बाहीच्या बाजुने दयावा हीच नम्र विनंती.

कुरखेडा

दिनांक २१/०६/२०२४

अर्जदार

अर्जदारातर्फे अधिवक्ता

## सत्यापण/शपथपत्र

मी अर्जदार नामे सौ. शारदा महेश कावळे वय २८ वर्षेधंदा-घर काम रा.गांधी वार्ड कुरखेडा ता.कुरखेडा जि.गडचिरोली येथील रहीवासी असूण आज या खरयापणाच्या सत्यापणावर माझया माहीती प्रमाणे व सांगण्याप्रमाने लिहलेला असुन सदरचे अर्जामधील संपुर्ण मी वाचुन व समजुन घेतला असुन तो खरा व बरोबर आहे. करीता हया खरेपणाचे सत्यापणावर सही करीत आहे.

कुरखेडा

दि.२१/०६/२०२४

शपथकर्थी

**प्रतिज्ञालेख**

श्री सौ. शारदा महेश कावळे, वय 28 वर्षे
राहणार कुरखेडा ता. कुरखेडा यांनी माझे
समक्ष विधीयुक्त गंभीरपणे पुरेपुर वृत्तांत खरा आहे असे
खात्रीपुर्वक शपथेवर कथन केले व श्री/अॅड. रुपाली
माकडे यांनी माझे समक्ष ओळख दाखविली
... व्यक्तिशः ओळखतो.

21/06/2024

सहाय्यक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय
कुरखेडा

मी अर्जदारास ओळख...
अॅड. रुपाली माकडे

CIVIL JUDGE (JR. DN.) AND J.M.F.C.
KURKHEDA
सत्यमेव जयते